# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००
ईमेल: secretary@msbte.com
संकेतस्थळ : www.msbte.org.in


जा.क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा)/उ.प.२२फेरपरीक्षा/F१५/२०२२/ २३१ दिनांक :- 14 SEP 2022

**महत्वाचे परीपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद मान्यता प्राप्त अभियांत्रिकी व
औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित सर्व संस्था

**विषय — उन्हाळी परीक्षा-२०२२ दरम्यान गैरप्रकार प्रकरणी दोषी असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या '१+१' शिक्षेत शिथिलता व त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत...**
**संदर्भ — मंडळाची विशेष समितीची दि. १४/०९/२०२२ रोजीची बैठक**

उन्हाळी परिक्षा-२०२२ दरम्यान गैरप्रकार प्रकरणी दोषी असलेल्या विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांना विशेष समितीच्या शिफारशीनुसार '१+१' अशी शिक्षा देण्यात आली होती. काही संस्था व संघटना यांचेकडून कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने सदर विद्यार्थ्यांना देण्यात आलेली शिक्षा शिथिल करावी, याबाबत निवेदने प्राप्त झाली होती. त्यावर विशेष समितीच्या संदर्भीय बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करून विद्यार्थी हितास्तव अपवादात्मक परिस्थितीत केवळ उन्हाळी परीक्षा-२०२२ मध्ये ज्या विद्यार्थ्यांना '१+१' अशी शिक्षा देण्यात आली होती, त्यामध्ये '१+०' असा बदल करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

वरील नमूद शिक्षेमधील बदलाच्या अनुषंगाने सर्व विद्यार्थी व संस्थांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे -

१) '१+०' अशी सुधारीत शिक्षा झालेल्या तसेच यापूर्वी '१+०' अशी शिक्षा झालेल्या अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांना उन्हाळी-२०२२ फेरपरीक्षा देण्याची संधी देण्यात येत आहे. फेरपरीक्षा अर्ज नियमित शुल्कासह भरणे व निश्चित करणेबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे -

| अ. क्र. | फेरपरीक्षेचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | परीक्षा अर्ज स्विकृती<br>संस्थांनी परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे (Institute fill and Confirmation)<br>विभागीय कार्यालयांनी परीक्षा अर्ज निश्चित करणे (RBTE Confirmation) | <br>१५ सप्टेंबर, २०२२<br><br>१६ सप्टेंबर, २०२२ |

जे विद्यार्थी उपरोक्त कालावधीत फेरपरीक्षा अर्ज भरतील, अशा विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा दि. १७ ते २० सप्टेंबर, २०२२ दरम्यान आयोजित करावी व फेरपरीक्षा अर्ज विभागीय कार्यालयांनी निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांचे फेरपरीक्षेचे ओळखपत्र व ई-मार्कशिट दि. १९/०९/२०२२ पूर्वी संस्थांना उपलब्ध करून देण्यात येतील. सदर ई-मार्कशिट संस्थांना उपलब्ध झाल्यानंतर गुण भरून

निश्चित करावेत. तसेच अशा सर्व विद्यार्थ्यांची लेखी फेरपरीक्षा मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसारच दि. २१/०९/२०२२ ते ०४/१०/२०२२ दरम्यान घेण्यात येतील.

२) सदर शिक्षेतील बदलामुळे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पुढील वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्याकरीता मंडळाच्या दि. २९/०८/२०२२ रोजीच्या परीपत्रकान्वये देण्यात आलेल्या एकवेळ संधीसाठी पात्र होणा-या विद्यार्थ्यांची नावे 'OTO' साठी संस्थांना login उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यानुसार 'OTO Registration' बाबतची कार्यवाही दि. २१ सप्टेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करावी.

वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्या निदर्शनास आणून याबाबतची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी-
मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद